# हॉटेल बुकिंगबाबत लवकरच नियमावली

## ऑनलाइन फसवणूक रोखण्यासाठी पाऊल

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

सध्या सर्वत्र पर्यटनाचा काळ सुरू आहे. त्यामुळे हॅटिल बुकिंग जोमात आहे. यामध्ये ऑनलाइन फसवणुकीचे प्रमाणही वाढले आहे. त्याचा फटका खऱ्या हॅटिल व्यावसायिकांना बसत आहे. त्यामुळे त्यांनीच आता अशा फसवणुकीविरोधात स्वतंत्र नियमावली तयार करण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

'द हॅटिल अँड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया'ने (एचआरएडब्ल्यूआय) ऑनलाइन हॅटिल बुकिंगमधील फसवणुकीच्या वाढत्या घटनांबाबत लवकरच महत्त्वाचे पाऊल उचलण्याचा निर्णय घेतला आहे. लोकप्रिय सर्च इंजिनमध्ये खऱ्या भासतील अशा हॅटिलच्या खोट्या संकेतस्थळांची यादी फसवणूक करणाऱ्यांकडून टाकली जाते. अनभिज्ञ ग्राहकांना सर्च इंजिनमध्ये चित्र बघून भूरळ पडते. त्याआधारे रूम बुकिंगसाठी पैसे भरायला लावून त्यांची फसवणूक केली जाते. मात्र यामुळे संपूर्ण आदरातिथ्य व हॅटिल क्षेत्राची प्रतिमा मलीन होत असल्याबद्दल असोसिएशनच्या सदस्य संस्थांनी चिंता व्यक्त केली आहे. ही फसवणूक रोखण्यासाठीच स्वतंत्र नियमावली तयार करता येईल का, याबाबत संघटनेने तयारी सुरू केली आहे.

'सायबर-गुन्हेगारांकडून हॅटिल आणि रेस्टॉरंटची खोटी बुकिंग संकेतस्थळे तयार केली जातात. या कृत्यामुळे केवळ ग्राहकांचेच आर्थिक नुकसान होते असे नव्हे, तर आदरातिथ्य आस्थापनांच्या प्रतिष्ठेचीही यामुळे मोठ्या प्रमाणात हानी होते. ऑनलाइन बुकिंग करताना ग्राहकांनी दक्षता बाळगावी आणि कोणत्याही प्रकारच्या संशयास्पद बाबींची संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करावी. अशा फसवणुकीपासून नागरिकांचे आणि व्यवसायिक संस्थांचे संरक्षण करण्यासाठी कायदे केले जावेत, यासाठी आम्ही लवकरच सरकारशी चर्चा करणार आहोत,' असे 'एचआरएडब्ल्यूआय'चे अध्यक्ष प्रदीप शेट्टी यांनी सांगितले.

H&R A
WESTERN INDIA
Estd : 1951